MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

## पेठ बीड पोलीस स्टेशनचे मोठे योगदान शांततेत रॅलीस सुरुवात

पेठ बीड पोलीस स्टेशन च्या हद्दीतून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला मराठा आरक्षण युद्धाचे जनक मनोज दादा जरांगे पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून शांतता तयारीला सुरुवात केली यावेळी पेठ बीड पोलीस स्टेशनचे पीआय मंदिराज व पेड बीड पोलीस स्टेशनचे सर्व कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त लावत यावेळी करडी नजर ठेवून यशस्वीपणे रॅली ही पुढे म्हणजेच बीड शहर चे हद्दीत पाठवली यावेळी पेडवेअर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी तारेवरची कसरत करून डोळ्यांमध्ये तेल घालत रात्रीचा दिवस आणि दिवसाची रात्र करत करत बीड शहरामध्ये शांतता राबविण्यासाठी पेड बीड पोलीस पोलिसांनी मोठे परिश्रम घेतले आहेत .जनतेकडून  पेठ बीड पोलीस स्टेशनचे पीआय अशोक मंदिराज सह सर्व कर्मचारी पोलीस बांधवांचे कौतुक होत आहे.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष –०१ अंक –२८९ शुक्रवार दि.१२ जुलै २०२४ आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -289 FRIDAY DT. 12 JULY 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# वेलडन बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर

# असा पोलीस अधीक्षक पुन्हा होणार नाही ही बीड जिल्ह्यातील जनतेची भावनिक साद...















- अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर ,बीडचे डीवायएसपी  विश्वंभर गोरडे याचं कार्य कौतुकास्पद.
- मराठा आरक्षण शांतता रॅलीची मोठी जबाबदारी बीड जिल्हा पोलीस दलाने नंदकुमार ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी करून दाखवली.
- बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर व बीड जिल्हा पोलीस दलातील अधिकारी कर्मचारी यांचेही यावेळी कार्य कौतुकास्पद आहे.
- संकटाची खांद्यावर घेतलेली वारी यशस्वीरित्या पार पाडणारे पोलीस निरीक्षक.
- शेख उस्मान ,अशोक मुदीराज, शीतलकुमार बल्लाळ ,शिवाजीराव बंटेवाड , मारुती खेडकर ,सुभाष सानप,विजय जाधवर, बंजरग कुठंबरे . मनोज परजणे विजय गायकवाड बप्पा सारणीकर शेख शहेनशहा युनूस बागवान गणेश हंगे राहुल शिंदे सुभाष मोटे, शेख अशपाक आधी पोलीस कर्मचाऱ्यांनी मोठी मेहनत घेतली आहे.
- शांतता कमिटी ची बैठक घेऊन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी शांततेची आव्हान केलेले प्रयत्न हे यशस्वी
- बीड मध्ये झालेल्या मराठा आरक्षण शांतता रॅलीच्या पेठ बीड शहर दीड ग्रामीण शिवाजीनगर सह बीड एलसीबीची दमदार कामगिरी रॅली शांततेत झाल्यामुळे जनतेमध्ये पोलीस प्रशासनाविषयी आदर सन्मान
- बीड जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या पुण्यामध्ये मात्र बीड एलसीबीने सह बीड जिल्ह्यातील २८ पोलीस स्टेशनमध्ये अनेक आरोपींना केले जेरपण योग्य तपास करत पोलीस
- अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांचे नेतृत्व बीड जिल्ह्यातील पोलीस स्टेशनचे प्रभारी व बीड जिल्ह्यातील पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन यशस्वी असा एस पी पुन्हा

## बीड जिल्हा पोलीस दलामध्ये चांगले अधिकाऱ्यांच्या कामाचं कौतुक

बीड/ प्रतिनिधी

अनेक वादग्रस्त मुद्द्यांना यशस्वीपणे शांत पद्धतीने अभ्यासपूर्ण परिस्थितीची जाणीव करून घेत सर्व जाती धर्मांना शांत करण्याचे काम पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर व बीड जिल्हा पोलीस दलातील अनेक पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्याला सलाम बीड जिल्ह्यामध्ये अनेक वादग्रस्त मुद्दे सध्याच्या २०२३ २४ च्या राजकीय देशांमध्ये मराठा ओबीसी वाद असेल किंवा दलित सुवर्ण वाद असताना हिंदू मुस्लिम वाद असताना या सर्वांना शांतपणे सर्वांच्या जाती धर्मातील धर्मगुरूंना सोबत घेत नेते मंडळींना सोबत घेत सर्व सामान्य माणसाच्या सुखदुःखामध्ये बीड जिल्हा पोलीस दलातील अनेक अधिकारी कर्मचारी यांनी यशस्वीरित्या शांततेची आव्हान करत बीड जिल्ह्यातील जनतेला बीड जिल्ह्यासाठी सदैव शांतता ठेवण्यासाठी प्रयत्न करणारे बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांचे कार्य करावे तेवढे कमीच आहे ओबीसीचा वाद असेल किंवा मराठ्यांचा वाद असेल राजकारणातील वाद असेल कोरोना महामारीतील वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये बीड जिल्हा पोलीस दलातील अधिकारी कर्मचारी यांनी योग्य पद्धतीने प्रश्न हाताळात यावेळी मात्र बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस कर्मचारी यांनी डोळ्यात तेल घालून रात्रंदिवस बीड जिल्ह्यातील जनतेचे रक्षण केले आहे हेच रक्षण करत असताना या अगोदर बीड लोकसभेची निवडणूक असेल जातीच्या मुद्द्यावर पेटलेली बीड लोकसभेची निवडणूक ही पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी योग्य पद्धतीने हातात घेत यावेळी बीड जिल्ह्यातील जनतेला कार्यकर्त्यांना नेते मंडळींना शांततेचे आवाहन केले होते यांच्या आव्हानाची दखल घेत बीड जिल्ह्यातील नेते मंडळी धर्मगुरू व जनतेने नंदकुमार ठाकूर यांना मानसन्मान देत त्यांच्या  आव्हानाचे स्वागत करून शांतता बीड जिल्ह्यामध्ये ठेवली आहे जी की बीड जिल्ह्याच्या अनेक फेसबुक हर्रीर्ररवि सोशल मीडियाच्या वादग्रस्त जातीय तेढ निर्माण करणाऱ्या अनेक लोकांवरती कारवाया करण्यात आल्या या कारवाया करत असताना गुन्हेगारांचा यावेळी पाठीशी न घालता पोलीस प्रशासनाने गुन्हेगारांना धडा शिकवला व शांततेमध्ये राहण्यासाठी तंबी देऊन बीड जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी जनतेसाठी शांततेची केलेली आव्हान हे यशस्वीरित्या ठरले आहे याचाच एक भाग म्हणून बीड जिल्ह्यामध्ये लोकसभा निवडणूक झाल्याच्या नंतर सुद्धा वातावरण तापले होते व बीड जिल्ह्यातील लोकसभेच्या निवडणुकीच्या अगोदर सुद्धा बीड जिल्ह्यामध्ये जातीय ते निर्माण करण्याचे अनेकांचे उद्देश व मनसुबे हे राजकारणी लोकांचे होते परंतु यावेळी बीड जिल्ह्यात पोलीस प्रशासनाने हातामध्ये कायदा घेणाऱ्याच्या विरोधामध्ये बडगा उघडल्यानंतर संबंधित नेते मंडळी व जातीय तेढ निर्माण करणारे समाजकंटकांवरती कारवाया करत यावेळी बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांनी मात्र शांततेची आव्हान करत असताना आपण जर काही चूक केली तर नक्की शिक्षा होऊ शकते याची जाणी करून दिली याचाच एक भाग म्हणून यावेळी शांततेचे आवाहन करत असताना पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर व बीड जिल्हा पोलीस दलातील सर्व अधिकारी कर्मचारी टीम यांचेही कौतुक करावे तेवढे कमीच आहे अशी चर्चा बीड जिल्ह्यातील जनतेच्या वतीने नंदकुमार ठाकूर यांचे अभिनंदन वर्षा होत असतानाच मात्र यावेळी बीड जिल्ह्याला पुन्हा नंदकुमार ठाकूर यांच्यासारखा पोलीस अधीक्षक मिळणार नाही अशीही चर्चा सर्वसामान्य जनतेतून ऐकायला मिळत आहे.

वाहतूक शाखेची वाहतुकीसाठी काल मोठी कसरत यशस्वी.

बीड शहर पोलीस वाहतूक शाखेची श्री सुभाष सानप  सहाय्यक पोलीस निरीक्षक जिल्हा वाहतूक शाखा बीड पीएसआय विजय जाधवर पीएसआय कुटुंबरे  सर्व पोलीस कर्मचारी वाहतूक शाखा. पीएसआय विजय जाधवर व कुटुंबरे यांनी सर्व परिस्थिती नियंत्रणात आणत काल बीड जिल्ह्यातून वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून वेगवेगळ्या मार्गावरून वाहतूक वळवली व ही वाहतूक बीड शहरांमध्ये येऊन परत जाण्यापर्यंत रात्री उशिरापर्यंत वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचारी यावेळी रस्त्यावरती उपस्थित होते यावेळी वाहतु शाखेचे कार्य कौतुकास्पद आहे अशी चर्चा यावेळी लोकांमधून ऐकायला मिळत आहे.बीड शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये पेड बीड मधून मराठा आरक्षण शांतता रॅली आल्यानंतर बीड शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ व त्यांच्या टीमने योग्य पद्धतीने काम करून यावेळी बीड शहरातून जाणारी वाहतूक व बीड शहरात शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये शांतता रॅली आल्याच्या नंतर योग्य पद्धतीने बंदोबस्त लावला होता या बंदोबस्तासाठी बीड शहर केली यावेळी बीड शहर पोलीस स्टेशन च्या हद्दीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक काही परिसर येतो यावेळी मराठा आरक्षण चे जनक मनोज दादा जरांगे पाटील यांनी यावेळी जनतेला या ठिकाणी संबंधित केले यावेळी बीड शहर पोलीस स्टेशन केलेल्या बंदोबस्तामध्ये कुठल्याही प्रकारची चूक झालेली नाही या बंदोबस्तामध्ये सर्व जाती धर्मातील लोकांना सामावून घेत धर्मगुरूंना व समाजसेवकांना सोबत घेत बीड शहर पोलीस स्टेशन ने शांततेचे आवाहन केले होते या कवितेचे आव्हाने यशस्वी झाली व बीड शहर पोलीस स्टेशनचे पीआय शीतल असं सर्व पोलीस कर्मचारी यांचे कौतुक यावेळी बीड शहर पोलीस स्टेशन हद्दीतील जनतेकडून कौतुक होत आहे.

## बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे कार्य कौतुकास्पद

बीड जिल्ह्यामध्ये मराठा आरक्षण योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांची शांतता रॅली साठी बीड ग्रामीण सह जिल्ह्यातून यावेळी जनता मनोज दादा जरांगे पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करण्यात आली ही गर्दी बीड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हदून येत असताना बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिवाजीराव बंटेवाड यांनी व बीड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या सर्व कर्मचारी अधिकारी यांनी योग्य पद्धतीने हाताळत बीड शहरांमध्ये एन्ट्री करत असताना बीड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी सुद्धा मोठी कार्यावरची कसरत करत शांततेची आव्हान करत संबंधित जनतेला गर्दीच्या स्वरूपामध्ये दीड शहरांमध्ये ओढ्याची ओळी जनतेचे लोणचे लोंढे येत होते ही पाहून बीड ग्रामीण पोलीस स्टेशन ने शांत पद्धतीने योग्य मार्गदर्शन करत संबंधित पार्किंगसाठी केलेल्या जागा व शांततेत जा व आंदोलन शांतता कमिटी च्या सदस्यांना दीड ग्रामीण मधील नेते मंडळींशी चर्चा करून बीड ग्रामीण पोलीस स्टेशन यांनी योग्य पद्धतीने ग्रामीण भागातून येणाऱ्या मराठा बांधवांना धर्मातील लोकांना शांततेमध्ये बीड शहरांमध्ये इंट्री दिली यावेळी मात्र बीड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या सर्व कर्मचाऱ्यांचे बीड जिल्ह्यात तीन लोकांकडून कौतुकाची थाप देण्यात येत आहे. बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिवाजीराव बंटेवाड यांनी चोख नियोजन करून सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या होत्या संबंधित आंदोलन हे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर पोलीस अधीक्षक अतिरिक्त सचिन पांडकर बीडचे डीवायएसपी विश्वंभर गोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित बंदोबस्त पार पाडत शांतता राखत बीड स्टेशन ने चांगले काम केल्याची चर्चा बीड जिल्ह्यामध्ये सध्या ऐकायला मिळत आहे.

## बीड एलसीबी चे कार्य कौतुकास्पद

बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या नेतृत्वाखाली बीड एलसीबीने सोफ बंदोबस्त योग्य नियोजन आणि तिसऱ्या डोळ्याने पाहण्याचे काम म्हणजेच आहे बीड एलसीबी चे सर्वच कर्मचारी यांनी दिवसाचा रात्र आणि रात्रीचा दिवस करत मनोज दादा जरांगे पाटील मराठा आरक्षणाचे जनक यांच्या नेतृत्वाखाली मराठा आरक्षण शांतता रॅलीचे आयोजन विषयांमध्ये करण्यात आले होते या शांतता रॅलीमध्ये मात्र बीड एलसीबीने डोळ्यात तेल घालून चूक बंदोबस्त करत यशस्वीरित्या चोर चक्के जातीयवादी तेड निर्माण करणारे लोक यांना आपल्या डोळ्यासमोर ठेवून त्यांनी लाखोच्या संख्येमध्ये असणाऱ्या गुन्हेगारांना बाजूला काम केल्यामुळे नव्याने बीड एलसीबी ला रुजू झालेले पोलीस निरीक्षक शेख उस्मान ख्वाजा यांच्या नव्या स्वरूपाने त्यांनी सूत्र हलवत बीड जिल्ह्यातील मराठा आंदोलकांनी काढलेल्या शांतता रॅलीमध्ये मोठे यश प्राप्त करत शांतता राखली आहे यामध्ये शेख उस्मान खाजा एलसीबीपीआय यांनी यावेळी नवीन पदभार स्वीकारताच हे मोठे आव्हान यावेळी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या समोर स्वीकारत शांतता राखण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले व ते यशस्वी ही झाले यावेळी मात्र शेख उस्मान यांच्या जुना अनुभव असलेला कामी आलेच चर्चा बीड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस कर्मचाऱ्यांकडून ऐकायला मिळत आहे तर बीड जिल्ह्यातील जनतेच्या वतीने शेख उस्मान यांचेही अभिनंदन करत शांतता यशस्वी राखल्यामुळे त्यांच्यावरती कौतुकाची थाप बीड जिल्ह्यातील जनतेकडून पडत आहे.

बीड शहरातील प्रामुख्याने पाहिले जाणारे सर्वात मोठी जिम्मेदारी असणारे पोलीस स्टेशन म्हणजे शिवाजीनगर पोलीस स्टेशन यामध्ये सर्व शासकीय कार्यालय आंदोलन निदर्शन मोर्चे सर्व नेते मंडळींचे निवासस्थान अधिकाऱ्यांचे निवासस्थान सह अनेक मोठे मोठे सर्व जिम्मेदारीचे वादग्रस्त असलेले काम हे शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये आहेत यावेळी शिवाजीनगर पोलीस स्टेशन मारुती खेडकर व त्यांच्या टीमने यावेळी चूक बंदोबस्त लावत पेड बीड शिवाजीनगर बीड ग्रामीण बीड शहर मधून जेव्हा शिवाजीनगर हद्दीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा काही परिसर या चौकामध्ये मनोज दादा जरांगे पाटील यांनी जनतेला संबंधित करण्यासाठी खूप मोठा बंद बसलावण्यात आला होता यावेळी लाखोच्या संख्येने आलेले मराठा समाजातील बांधवांना शांततेचे आव्हान करत यावेळी शिवाजीनगर पोलिसांनी मोठे आव्हान स्वीकारत यशस्वीरित्या त्यांनी त्यांची जिम्मेदारी पार पाडली ही जिम्मेदारी पार पाडत असताना पोलीसाची नंदकुमार ठाकूर अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर बीडचे डीवायएसपी विश्वंभर बोर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पीआय मारुती खेडकर यांनी यावेळी यशस्वी रित्या लावलेला बंदोबस्त व शिवाजीनगर पोलीस स्टेशन मधील कर्मचाऱ्यांना दिलेले आदेश व मार्गदर्शन हे आज बीड जिल्ह्यातील शांतता रॅलीसाठी यशस्वी ठरले मराठा समाजाची शांतता रॅली ही यशस्वी झाल्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये शांततेत वातावरण होते शिवाजीनगर पोलीस स्टेशनचा ही मोठा सिंहाचा वाटा या शांततेमध्ये आहे म्हणून बीड जिल्ह्यातील जनतेच्या वतीने मारुती खेडकर व  शिवाजीनगर पोलीस स्टेशन बीड चे सर्व पोलीस कर्मचारी त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# परळीतील विशेष रेल्वे प्रकल्प व विस्तार शहराच्या बाहेरून करा

## रेल्वेसाठी शहरातील जमीन अधिग्रहण तात्काळ थांबवा जिल्हाधिकाऱ्याकडे वंचित बहुजन आघाडीची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील महत्त्वाचे शहर म्हणून परळी शहराची ओळख आहे, औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र, सिमेंट कंपनी, बारा ज्योतिर्लिंगा पैकी एक अशी ओळख आहे. रेल्वेचा निजाम सरकारच्या काळा पासून उपयोग आहे व त्यामुळे मराठवाड्यासह जिल्ह्याचा व परळी शहराचा विकास देखील झाला आहे. विशेष रेल्वे प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहण करण्यासाठी सूचना सूचना रेल्वे मंत्रालय केंद्र सरकारने दिली आहे. पण शहराच्या बाहेर जमीन अधिग्रहण करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे यांच्याकडे केली आहे. निवेदन देते प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे सहसचिव पुरुषोत्तम वीर, प्रसिद्धीप्रमुख बालाजी जगतकर,अड. डी. आर. गोरे, संपादक बालासाहेब जगतकर, राजेश सरवदे, ज्ञानेश्वर गीते, संतोष वावळे आधी उपस्थित होते.




परळी परभणी विशेष रेल्वे प्रकल्प व दुहेरीकरण ना साठी जमीन अधिग्रहण कार्यक्रम हाती घेतला आहे. केंद्र सरकारने अधिसूचना देखील जाहीर जाहीर केली आहे. रेल्वे ट्रॅक दुहेरीकरण व विस्तार यामुळे परळी शहरातील जवळपास पंधरा ते वीस हजार लोकांच्या राहत्या घराला बसणार आहे त्यामध्ये, मिलिंद नगर बरकत नगर, आझाद नगर, जुना रेल्वे स्टेशन पद्मावती गल्ली, भीमा नगर या भागातील नागरिकांना फटका बसणार आहे. त्यावर उपाय म्हणून जमीन अधिग्रहण कार्यक्रम धुरीकरण विस्तारीकरण शहराच्या बाहेरून करावे अशी मागणी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे.

जमीन अधिग्रहण कार्यक्रमात ज्या लोकांची घरे पाडली जाणार आहेत त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय सेवेत नोकरी घेणे व व ज्यांची घरे यामध्ये जात आहेत त्यांना बाजार भावापेक्षा चारपट मावेजा देण्यात यावा अशी देखील मागणी करण्यात आली आहे. तीस दिवसात आपल्या हरकती परळी यांच्याकडे नोंदवणे आवश्यक आहे. या जमीन अधिग्रहण कार्यक्रमामुळे अनेक लोकांचे संसार उघड्यावर येणार आहेत. त्यामुळे तात्काळ रेल्वे जमीन अधिग्रहण कार्यक्रम थांबवावा. पर्यायी कार्यक्रम म्हणून तो शहराच्या बाहेर घेऊन जावा अशी देखील मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात येत आहे. अन्यथा लवकरच वंचित बहुजन आघाडीच्या वतीने केंद्र सरकारच्या विरोधात तीव्र स्वरूपात जनआंदोलन उभारण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

## महाराष्ट्र प्राईड अवार्डने दत्तात्रय मुजमुले सन्मानित

# जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीने पटकावला मानाचा पुरस्कार

**केज । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिर येथे दिनांक ७ जुलै रोजी राज्यस्तरीय सुपर अबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यास्पर्धे दरम्यान अबॅकस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीचे संचालक दत्तात्रय मुजमुले यांना अबॅकस क्षेत्रातील मानाच्या महाराष्ट्र प्राईड अवार्डने सन्मानित करण्यात येते.**

महाराष्ट्रात सुपर अबॅकसचे जवळपास सर्वत्र सेंटर्स आहेत. त्यामध्ये अबॅकस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या निवडक सेंटर्सना अबॅकस क्षेत्रातील मानाच्या महाराष्ट्र प्राईड अवार्ड दिला जातो त्यामध्ये बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मौजे धनेगाव कॅम्प येथील जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीचे संचालक दत्तात्रय मुजमुले यांना हा अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.




हा अवॉर्ड प्रदान करण्यासाठी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ पायल चौबे , शिवसेनेचे (शिंदे गट)जिल्हाप्रमुख तथा माजी उपमहापौर छत्रपती संभाजी नगर राजेंद्र जंजाळ,सुपर अबॅकसचे सर्वेसर्वा मनीष महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# कर्नाटकातील सतीश सुगर टीम कडून ३४% दरवाढ जाहिर .!

## वडवणीतील महादेवाची पूजा करुन नवीन करारास आरंभ

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यांमध्ये ऊसतोड मजूर हे जवळपास ४० टक्के आहे. आपल्या पोटाची कोळी भरण्यासाठी ते दिवस रात्र काबाड कष्ट करत असतात. मात्र तुमच्या कष्टाला योग्य मोबदला मिळत नव्हता. ३४ टक्के दरवाढ हि गेल्या हंगामात सरकार लावादामध्ये लागू केली होती. महाराष्ट्रातील साखर कारखानदारांनी दिली होती मात्र. कर्नाटक राज्यातील साखर कारखाना कानकुसरपणा करत होतो. महाराष्ट्र प्रमाणे मुकादम ने सर्व स्थळ मधुरांनाही वाढ दिली होती. मात्र साखर कारखानदारांनी मुकादम अण्णा दिली नव्हती , म्हणून ऊसतोड मुकादम यांच्यावर खूप मोठा संकट आलं होतं. ऊसतोड मुकादम संघटनेने आंदोलनाचा इशारा देखील दिला होता. आणि यांच्यामध्ये बैठक देखील पार पडली




होती. त्यामध्ये अनेक ऊसतोड मजुरांच्या मुकादम आणि वाहन मालक एकत्र येऊन लढा उभारला होता त्या लढ्याला यश आला आहे. मुकदम संघटना यांच्या व कारखानदार यांच्या, बैठकीमध्ये निर्णय झाला व एकंदरीतच ऊसतोड मजुरांना ३४% दरवाढ जाहीर करून, नवीन २०२४ गळीत हंगाम करारास प्रारंभ केला. यावेळी वडवणी तालुक्यात असणाऱ्या जागृत देवस्थान महादेव मंदिर येथे सकाळी अभिषेक करून महापूजा करून, खाण्याचे चेअरमन शेतकी अधिकारी व संपूर्ण सतिश शुगर टीम व मेन मुकादम यांच्या समवेत करारास प्रारंभ झाला.

# लोकनेत्या स्व.डॉ.सौ. विमलताई यांना मुंदडा यांना मरणोत्तर रोटरी भूषण पुरस्कार जाहीर


## मान्यवरांच्या उपस्थितीत होणार पुरस्कार वितरण सोहळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील लोकनेत्या स्व.डॉ.सौ. विमलताई नंदकिशोरजी मुंदडा यांना या वर्षीचा सन - २०२४-२५ यावर्षीचा मरणोत्तर रोटरी भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण २१ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता परिचय मंगल कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.अशी माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे,सचिव धनराज सोळंकी यांनी दिली.

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने दर वर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराचे वितरण केले जाते. या वर्षीचा हा रोटरी भूषण पुरस्कार स्व. डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांना मरणोत्तर जाहीर झाला आहे. अंबाजोगाई शहराचे भूषण असलेल्या

स्व. डॉ. सौ. विमलताई मुंदडा या परिसराच्या भाग्यविधात्या म्हणून ओळखल्या जातात. डॉ. विमलताई व केज विधानसभा हे जनु काही समीकरणच जुळलें होते.बीड जिल्ह्याच्या राजकारणात एक कर्तृत्ववान महिला सलग पाच वेळा



विक्रमी मताधिक्याने निवडून येते. हा वेगळा विक्रम त्यांनी प्रस्थापित केला आहे. सामान्य जनता व विमलताई हे नाते समाजमनात दृढ झाले होते.२४ वर्षे आमदार,व दहा वर्षे मंत्री म्हणुन त्यांनी संपुर्ण महाराष्ट्रात आपली नवी ओळख निर्माण केली होती.कसलाही राजकीय वारसा नसतानाही आपल्या कर्तुत्वावर व जनसेवेच्या माध्यमातून त्यांनी जनतेच्या मनावर अधिराज्य निर्माण केले होते.विकासकार्याच्या माध्यमातुन त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती.ताई या नावाचे वलय त्यांनी निर्माण केले होते.व ते नाते समर्थपणे जपण्याची किमया विमलताईनी साध्य केली होती.

कर्करोगा सारख्या आजाराने त्रस्त असुनही त्यांनी समाजाशी असणारी बांधीलकी कधी तुटु दिली नव्हती.पण या आजारानेच ताईना आपल्यातुंन हिरावुन नेले.परंतु ताईनी गेल्या २४ वर्षात आरोग्यमंत्री, बांधकाममंत्री,राज्यमंत्री,आमदार, म्हणुन केलेली अनेक कामे आजही त्यांची आठवण करुण देतात.या भागाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान कधीच विसरता येणार नाही.त्यांच्या कार्याची दखल घेऊन रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने त्यांना मरणोत्तर रोटरी भूषण पुरस्कार जाहीर केला आहे.

# धारूर शहरात डेंगूच्या रुग्णांची संख्या वाढली

किल्ले धारूर । प्रतिनिधी

पावसाळा सुरू झाल्यापासून डेंगू च्या रुग्णांची संख्या वाढू लागली आहे धारूर शहरातील नाथनगर व हनुमान गल्ली या परिसरामध्ये डेंगू च्या आजारात असलेल्या रुग्णांची दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिसून येत आहे नगर परिषदेने यावर प्रतिबंधक उपाययोजना म्हणून तात्काळ या भागात स्वच्छता व धूर फवारणी करणे आवश्यक आहे.

पावसाळा सुरू झाला की डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढते यामध्ये काही डास हे डेंगू सारख्या भयंकर आजाराला कारणीभूत ठरतात असे चावल्यामुळे डेंगू होऊन रुग्ण दगावण्याची शक्यता असते त्यामुळे वेळीच यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे धारूर शहरांमध्ये नगर



**नगरपरिषदने तातडीने शहराच्या स्वच्छते विषय उपायोजना राबवाव्यात**

परिषदेच्या वतीने धूर फवारणी व स्वच्छते विषयक जनजागृती करणे गरजेचे आहे दहा ते बारा डेंगू आजाराचे रुग्ण शहरात मागील काही दिवसात आढळून आले, शहरातील नाल्याची साफसफाई करणे व लोकांमधे जनजागृती करणे गरजेचे आहे या बाबत नगर परिषदेने गांभिर्याने घेऊन तातडीने उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.



**आज केज येथे चि. महेश शिवदास तपसे व चि सौ का अंजना शिवाजी नखाते यांच्या विवाहसोहळ्यास उपस्थित राहून केज मतदार संघाच्या नेत्या अंजली ताई घाडगे यांनी शुभेच्छा दिल्या**

# लाडक्या बहिणींची कागदपत्रांची जुळवाजुळव करताना धावपळ; दिलासा मिळेना!

## शेतात खुरपणी करण्यासाठी शेतमजूर महिलांची टंचाई

नवनाथ आडे ख गेवराई

गेवराई : राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेतून महिलांना दरमहा दीड हजार रुपये मिळणार आहेत. या योजनेसाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांसाठी महिलांची धावपळ सुरु आहे. यासाठी तलाठी कार्यालय, सेतू सुविधा केंद्र, तहसील कार्यालयात गर्दीच गर्दी पाहायला मिळत आहे. आवश्यक कागदपत्रे जमवाजमव करताना लाडक्या बहिणींची कसरत होताना दिसत आहे.

गेवराई तालुक्यातील बहुतांश महिलांची कामे सोडून कागदपत्रांची जमवाजमव करून अर्ज भरण्यासाठी धावपळ सुरू आहे. खरंतर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे कौतुकच, परंतु शेतीच्या कामाकडे पाठ फिरवून लाडक्या बहिणी अर्ज भरण्यास वन वन भटकत असल्याने शेतकऱ्यांना खुरपण करण्यासाठी शेतमजूर महिलांची टंचाई निर्माण झालेली आहे.

शेतीची कामे सुरू असतानाच राज्य शासनाकडून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू झाली. या योजनेतून लाभार्थी बहिणीला दरमहा १५०० रूपयांचे मानधन देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ मिळावा म्हणून ग्रामीण भागातील गाव खेड्यातील महिला कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यास व्यस्त झाले आहेत. परिणामी शेतीचे कामे रखडत चाललेले असून शेतमजूर, महिला बांधावर येण्यासाठी शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.



# ईमारती अभावी जिल्हा परिषद शाळा भरते लिंबाच्या झाडाखाली

## चनई तांडा वस्तीशाळेला १० वर्षांपासून ईमारत निधीच नाही :- डॉ.गणेश ढवळे



बीड । प्रतिनिधी

अंबेजोगाई शहरापासून ७ किलोमीटर अंतरावरील चनई ग्रामपंचायत अंतर्गत चनई तांडा येथील १०० जवळपास लोकसंख्या असलेल्या चनई तांडा याठिकाणी २०१४ पासुन जिल्हा परीषदेची प्राथमिक शाळा सुरू झाली.इयत्ता १ ले ५ वी पर्यंतचे विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत असुन गेल्या १० वर्षांपासून शासनाच्या वेळकाढू धोरण आणि दफ्तर दिरंगाई मुळे शाळेला ईमारत न मिळाल्याने ही शाळा आजही लिंबाच्या झाडाखाली भरते.दहा वर्षात शाळेला अनेक शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी, राजकीय पुढाऱ्यांनी भेटी दिल्या मात्र शाळेच्या स्थिती बाबत कोणाच्याही संवेदना जागे झाल्याच्या दिसुन येत नाही. सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे यांनी चनई तांडा वस्ती शाळेसाठी किमान १ रूम बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येऊन बांधकाम तातडीने पूर्ण करण्यात यावे अशी मागणी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

शाळेसाठी ईमारत नसल्याने लिंबाच्या झाडाखाली १० वर्षांपासून शाळा भरते.पावसाळ्यात मात्र चिखल होत असल्याने मुले शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी लहु आडे यांनी आपले राहते घर उपलब्ध करून दिले असुन आम्ही दिवसभर शेतात राबण्यासाठी जातो.संध्याकाळी येतो.दिवसभर तुम्ही मुलांच्या शाळेसाठी घर वापरा म्हणत संवेदनशीलता दाखवली ती कौतुकास्पद आहे.हि संवेदना मात्र लोकप्रतिनिधी आणि अधिकारी वर्गात दिसुन येत नसल्याचे संतापजनक आहे.

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ११ तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या अत्यंत धोकादायक असुन ४६९ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे.मात्र लोकप्रतिनिधी धार्मिक स्थळांसाठी कोट्यवधींचा निधी देताना ज्ञानमंदिरासाठी निधी उपलब्ध करून देण्यात निरूत्साही दिसून येत असुन जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागालाही याचे गांभीर्य दिसून येत नाही. हि अतिशय खेदाची बाब आहे.

## दलितांना पोट भरण्यासाठी दिलेल्या गायरानात विशिष्ट व्यक्तींना लाभ देण्यासाठी रस्ता मंजूर-लोक जनशक्ती पार्टी (र)



अंबाजोगाई । प्रतिनिधी

**अंबाजोगाई गटविकास अधिकारी यांना अंधारात ठेवून मोजे मुरंबी तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड येथे असलेल्या गायरानामध्ये काही धनदांगड्या व्यक्तींनी रस्ता बनवण्याचा घाट बनवला आहे त्यातच त्यांना प्रशासकीय अधिकारी ग्रामसेवक यांची सुद्धा मदत असल्याचे दिसून येत आहे ग्रामसेवक यांना लोक जनशक्ती पार्टी व लहुजी शक्ती सेनेच्या कार्यकर्त्यांनी हा रस्ता कोणत्या विभागा मार्फत मंजूर करण्यात आला आहे**

अशी विचारणा केली असता हा रस्ता शिव रस्ता आहे असा अजब युक्तिवाद ग्रामसेवकांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले परंतु गायरानात शिवरस्ता हा नसतो हे बहुदा ग्रामसेवकांना माहीत नसावे विशेष करून या गायरानाच्या मधोमध जवळपास अर्धा किलोमीटर काही श्रीमंत व्यक्तींच्या जमिनी असल्यामुळे या जमिनीला फायदा पोहोचवण्यासाठी दलित समाजाला मिळालेल्या गायरानाच्या मध्य भागामधून हा रस्ता करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे विशेष करून या रस्त्याचे टेंडर कधी निघाले टेंडर कधी मंजूर झाले आणि ते टेंडर किंवा हा रस्ता कोण करत आहे हे सुद्धा गावकऱ्यांना माहीत नसल्यामुळे या कामा संदर्भात शंका निर्माण होत आहे त्यामुळे त्या कामाची तक्रार गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना देण्यात आले यावेळी लोक जनशक्ती पार्टीचे तथा लहुजी शक्ती सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते यावेळी लोक जनशक्ती पार्टीचे परळी विधानसभा तालुका अध्यक्ष विशाल भैया शेवाळे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अशोक भैया काळे आदित्य भैया चौरे लहुजी शक्ती सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष आदित्य मोटे ऋषिकेश शिरसागर अशोक कांबळे समाधान घुगे अशोक कांबळे

## साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे पेठबीड सार्वजनिक जयंती उत्सव समिती जाहीर

### अध्यक्षपदी अक्षय कोकाटे तर सचिवपदी विशाल चांदणे यांची निवड





बीड ।प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे बीड सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी अक्षय कोकाटे तर सचिव पदी विशाल चांदणे निवड करण्यात आली आहे. अजिंक्य भैय्या चांदणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भारत कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये सर्वानुमते या निवडी करण्यात आले आहेत. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या व व्यापक स्वरूपात जयंती उत्सव साजरा करण्याचे बैठकीत ठरले आहे. पेठ बीड सार्वजनिक जयंती उत्सव समिती तर्फे विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.

यामध्ये भव्य मिरवणूक, व्याख्यानमाला,संगीत रजनी, निबंध स्पर्धा, रक्तदान शिबिर,चित्रकला स्पर्धा, तसेच विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्याचे वाटप देखील करण्यात येणार आहे. जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी पुढील प्रमाणे.अध्यक्षपदी अक्षय कोकाटे तर सचिव पदी विशाल चांदणे. उपाध्यक्ष म्हणून प्रकाश चांदणे, संतोष भिसे, सहसचिव उमेश खुपसे, लखन गायकवाड, कार्याध्यक्ष अविनाश लांडगे, सह संघटक महेश लोळके, अक्षय लांडगे, नितीन चांदणे, प्रसिद्धीप्रमुख सिद्धार्थ चांदणे, अविनाश चांदणे, मिरवणूक प्रमुख भारत चांदणे, शरद खूपसे, साहित्य दिंडी प्रमुख सनी चांदणे, प्रेम गायकवाड, रक्तदान शिबिर प्रमुख योगेश वाघमारे, अशोक कानडे, शुभम खूपसे आधी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

## राज्यातल्या धनगर आरक्षणाचा प्रश्न न सोडवल्यास तीन डब्याचे सरकार घरी पाठवा-दत्ता वाकसे




बीड/प्रतिनिधी

राज्यातील धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाच्या अंमलबजावणी करण्यात यावी त्याचबरोबर छत्रपती संभाजी नगर येथील एका भावाला धनगड आदिवासी प्रमाणपत्र आणि दुसऱ्या भावाला तगछ्ढ म्हणजे ओबीसी हे प्रमाणपत्र दिलेला आहे त्याची व्हॅलिडीटी कशी झाली आणि एका भावाला आदिवासी प्रमाणपत्र कसे दिले आणि दुसऱ्या भावाला ओबीसीचे व्ही जे एन टी कास्ट प्रमाणपत्र कसे दिले व ज्या भावाला धनगड प्रमाणपत्र दिले आहे त्याचे प्रमाणपत्र तात्काळ रद्द करून धनगर हेच धनगड आहेत असे असे एफडूट राज्य सरकारने कोर्टामध्ये दाखल करणे अपेक्षित होते परंतु राज्यातील धनगर समाजाच्या तोंडाला पाणी पुसण्याचे काम आणि पाप राज्य सरकारने केलेले आहे तीन डब्याच्या सरकारने केलेले आहे जर का विधानसभा निवडणुकीच्या अगोदर राज्य सरकारने धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी केली नाही तर राज्यातील तीन डब्याचे सरकार घरी पाठवण्याचं काम राज्यातील पाच कोटी धनगर समाज बांधवांनी करावे असे उपोषण स्थळे संबोधित करताना शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केले आहे

पुढे ते म्हणाले की लातूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याच्या शेजारी धनगर समाजातील अनिल गोयेकर, चंद्रकांत अण्णा हजारे हे उपोषणासाठी बसलेले असून आज त्यांचा उपोषणाचा अकरावा दिवस आहे तरी त्यांच्या जीवितास काही हानी झाल्यास राज्य सरकार जबाबदार राहील सध्या परिस्थिती पाहिली तर राज्य सरकार हे प्रत्येक समाजाला झुलवण्याचे काम करत आहे त्यामुळे धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा अन्यथा त्याचे परिणाम आगामी होऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये निश्चित भोगावे लागतील राज्यातील धनगर समाजाचा स्वस्त बसणार नाही सध्या परिस्थिती पाहता धनगर आरक्षणाचा प्रश्न अतिशय ऐरणीवर असून तात्काळ मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी विशेष लक्ष घालून धनगर आरक्षणाचा प्रश्न सोडून द्यावा अन्यथा आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये धनगर समाज आपली ताकद दाखवून देईल त्यामुळे होणाऱ्या परिणामाला राज्य सरकारला जबाबदार राहावा लागेल यावेळी उपोषणकर्त्यांना भेटण्यासाठी पहाडी राजा डॉ. व्यंकटेश चामनर, शेपवाडीचे माजी सरपंच अंकुशराव ढोबळे, प्रशांत पवार आदी उपस्थित होते

## जिल्हा रुग्णालयात २-ड़ी इको तपासणीत १५ बालकांना आढळला हृदयाचा आजार

बीड ।प्रतिनिधी

दिनांक ११ जुलै २०२४ गुरुवार रोजी बीड जिल्हा रुग्णालयात बालकांचे तपासणी शिबिर घेण्यात आले. यात १५ बालकांना हृदयाचा आजार आढळल्याने त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पंधरा बालकांचा आजार औषधोपचाराने बरा होणार असल्याचे तज्ञ डॉक्टरांनी सांगितले. आरबीएसके कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात एकूण ३९ वैद्यकीय पथके कार्यरत आहेत. सदरील पथकांमार्फत अंगणवाडीतील बालकांची आरोग्य तपासणी वर्षातून दोन वेळेस व शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी एक वेळेस करण्यात येते.

शिबिराकरिता तज्ञ डॉ. श्रीनिवास व डॉक्टर निलेश बच्छाव यांनी तपासणी केली. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक बडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शेख रऊफ़, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सचिन शेकडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एल.आर. तांदळे, डॉ. हनुमंत पारखे उपस्थित होते. बीड, गेवराई, पाटोदा, शिरूर, माजलगाव, वडवणी या तालुक्यातील शाळा व अंगणवाड्यांमध्ये एकूण ११४ लाभार्थी उपस्थित होते. यापैकी ६० लाभार्थ्यांची २-डी इको तपासणी करण्यात आली. ज्यामध्ये ३० लाभार्थी सर्वसामान्य होते. शस्त्रक्रिया करण्यासाठी १५ लाभार्थी पात्र झाले.

# स्वाराती रुग्णालय आहे कि लुटारुचा अड्डा ?

## रुग्णाचे बेहाल, डॉक्टर करतायत रुग्णांची पळवा पळवी!




अंबाजोगाई (प्रतिनिधी)

स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय हे गोरगरीब रुग्णांची जीवन संजीवनी मानली जाते मात्र येथे मागील काही महिण्यापासून रुग्णाचे हेळसांड होत असून रुग्णांची प्रचंड लूट केली जात आहे.अति दक्षता वार्डात जाण्यापूर्वी देवासमोर कर्मचारी १०० रुपये ठेवायले सांगतात डिस्चार्ज होताना कर्मचाऱ्यांना पैसे द्यावे लागतात अद्यावत ब्लड बँक असताना शहरातील बाहेरच्या लॅब वाल्याकडे रक्त तपासणी साठी पाठवले जाते

विशेषत: त्यांनी सांगितलेल्या लॅब मध्येच जावे लागते किंबहुना इतर लॅब चा रिपोर्ट आणला तर ते पाहतही नाही परिणामी रुग्णांना आर्थिक लुटिचा सामना करावा लागतो. ठराविक औषध वगळता बहुतांश गोळया औषधे बाहेरच्या मेडिकल वरून घ्यावी लागतात दवाखाना चे प्रधानमंत्री जनऔषधी मेडिकल हे नावालाच असून औषध विक्री मात्र इतर मेडिकल च्या भावाने होत असून इथेही रुग्णांची लूट होत आहे त्याच बरोबर येथील शासकीय सेवेत असणारे डॉक्टर पत्नी व नातेवाईकांच्या नावावर काढलेल्या खाजगी रुग्णालयात रुग्णसेवा देण्यात व्यस्त असल्याने स्वार्थी रुग्णालयातील रुग्णांना वेळेत उपचार होत नाहीत तसेच येथे येनाऱ्या रुग्णांची पळवा पळवी येथील डॉक्टर करत त्यांच्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी येण्यास सांगतात येथेही त्यांची लूट होत असून स्वाराती रुग्णालय आहे की लुटारूचा अड्डा हा प्रश्न पडत असून स्वाराती रुग्णालयातील रुग्णांची हेळसांड व लूट थांबवण्याकरता कोणताही सामाजिक कार्यकर्ता पुढे सरसावत नसल्याने अंबाजोगाई डिजिटल मीडिया परिषद पुढे येत स्वरातीचे अधिष्ठाता यांना निवेदन दिले यावेळी उपाध्यक्ष संजय जोगदंड,मार्गदर्शक सतीश मोरे,सचिव मोहम्मद फैझान,गजानन चौधरी,अरेफ सिद्दीकी, उत्तरेश्वर शिंदे,अहमद पठाण हे उपस्थित होते स्वरातीर येथे कार्यरत डॉक्टरांच्या खाजगी प्रॅक्टिस बंद करावी तसेच रुग्णांची होणारी आर्थिक लूट थांबवली गेली नाही तर डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे हे सोमवार पासून आमरण उपोषणास बसणार आहेत.

## जरांगे पाटलांच्या मराठा शांतता रॅलीला गेवराई तालुक्यातून हजारो मराठा उपस्थिती

### बदामराव पंडितांकडून जेवणाची व्यवस्था



गेवराई । प्रतिनिधी

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या बीड येथील मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीसाठी गेवराई तालुक्यातून हजारो मराठा समाज बांधव वाजत गाजत सहभागी झाले होते. दरम्यान शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यावतीने पाडळसिंगी येथे रॅलीत सहभागी होणाऱ्या सर्व समाज बांधवांसाठी भोजन व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या आरक्षणाचा लढा देत असून राज्य सरकारला आरक्षणाबाबत निर्णय घेण्यासाठी १३ जुलै २०२४ ची मुदत दिल्यानंतर त्यांची मराठवाड्यात मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली सुरू आहे. या रॅलीच्या स्वागतासाठी गेवराई तालुक्यातील ठिकाणी मनोज जरांगे पाटलांचे मोठमोठे बॅनर, कट आउट आणि स्वागत कमान लावण्यात आले होते. त्यासोबतच रस्त्याच्या दुतर्फा भगवे ध्वजही लावण्यात आले होते. दिनांक ११ जुलै रोजी बीड येथे झालेल्या या विराट रॅलीत गेवराई तालुक्यातून हजारो मराठा समाज बांधव भगवे झेंडे लावलेल्या मोटरसायकल जीप, ट्रॅक्टर, जेसीबी, ट्रक, टेम्पो आदी वाहनांनी ढोलीबाजा, डफडे, ताशा वाजवत सहभागी झाले होते. यात महिलांचीही लक्षणीय उपस्थिती होती. गेवराई ते बीड दरम्यान पाडळशिंगी टोलनाक्याजवळ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वतीने जरांगे पाटलांच्या रॅलीमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व समाज बांधवांसाठी भोजन व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या ठिकाणी माजी मंत्री बदामराव पंडित यांच्यासह जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित व युवानेते यशराज पंडित यांनी समाज बांधवांचे स्वागत केले. बीड येथील रॅली संपल्यानंतर आपल्या गावी परत जाणाऱ्या मराठा समाज बांधवांच्याही भोजनाची व्यवस्था पंडित परिवाराकडून करण्यात आली होती. दरम्यान मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत सावलीप्रमाणे उपस्थित राहणारे अंतरवाली सराटीचे सरपंच पांडुरंग तारक यांनी भोजन कक्षाला भेट देऊन समाधान व्यक्त केले. याप्रसंगी पत्रकारांसह गेवराईतील मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चाटे इंग्लिश स्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



### विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

केज । प्रतिनिधी

**शहरातील चाटे इंग्लिश स्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम बुधवार रोजी आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे अध्यक्ष हनुमंत भोसले सर तर प्रमुख पाहुणे शिक्षण विस्तार आधिकारी संजय चौरे, डॉ हनुमंत सौदागर दुर्गादास लांब, संस्थेचे सचिव शिवाजी चाटे आदींच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा मेडल व सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.**

या वेळी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची किट देण्यात आली. व विध्यार्थीना मार्गदर्शन करताना हनुमंत भोसले म्हणाले की विद्यार्थ्यांची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी शाळेबरोबर शिक्षक ही तितकेच महत्त्वाचे असतात ज्या मुळे विध्यार्थी घडला जातो आणि असे विध्यार्थी घडवण्याचं काम चाटे स्कुल मध्ये शिक्षक घडवत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. तर डॉ हनुमंत सौदागर यांनी बोलताना विध्यार्थीना म्हणाले ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी यश मिळवण्यासाठी सतत प्रयत्न शील रहावे. कृतिशीलता जोपासावी असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांवर संस्कार करताना शिक्षकांनी त्यांना क्रियाशील बनवावे असे मत संजय चौरे सर यांनी व्यक्त केले आहे या वेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी चाटे यांनी केले. तर सूत्रसंचालन आणि आभार श्रीमती बडे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने परळीत १५ ते २६ जुलै दरम्यान मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत नोंदणी करण्यासाठी खास मोहीम

## ना.धनंजय मुंडे, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळीत विशेष आयोजन

परळी ।प्रतिनिधी

राज्य शासनाने नव्याने सुरू केलेल्या व महिलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असलेल्या 'मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजने'मध्ये नव्याने नाव नोंदणी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी परळी च्या वतीने विशेष नोंदणी अभियान दि. १५ जुलै ते २६ जुलै च्या दरम्यान संपूर्ण परळी शहरामधून राबविण्यात येणार आहे.

१५ ते २६ जुलै या दरम्यान राज्याचे कृषिमंत्री तथा परळीचे लाडके आमदार ना. धनंजय मुंडे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार तसेच भाजपने त्या मा. पंकजाताई मुंडे यांच्या जन्मदिवसाच्या औचित्य साधून या विशेष अभियानाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.



या नोंदणी अभियानासाठी परळी वैजनाथ शहरातील प्रत्येक वार्डमध्ये नोंदणी अभियानाची व्यवस्था करण्यात आली असून महिला भगिनींनी योजनेसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे घेऊन आपल्या वार्डातील निश्चित करण्यात आलेल्या नोंदणी स्थळी संपर्क साधून आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे.

महामॅरेथॉन स्पर्धा

राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त सोमवार दिनांक १५ जुलै रोजी सकाळी ७:०० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, परळी-वै च्या वतीने शालेय गट,खुला गट,ज्येष्ठ नागरिक गट,महिला गट या चार गटात 'महामॅराथॉन स्पर्धा' आयोजित केली असून 'त्रीशशप झरीश्रळ...उश्रशरप झरीश्रळ' हा निर्धार या 'महामॅराथॉन' स्पर्धेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

'महामॅराथॉन' स्पर्धेत प्रत्येक गटात आकर्षक पारितोषिक,मानचिन्ह प्राप्त होणार असून सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्पर्धकास सहभाग प्रविण्य प्रमाणपत्र आणि एक वृक्ष भेट दिले जाणार आहे....तेंव्हा आबालवृद्ध नागरिकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून 'हरीत परळी.. स्वच्छ परळीचा निर्धार घ्यावा!स्पर्धा सुरु होण्याचे ठिकाण परळी शहर पोलीस स्टेशन समोरुन 'संत सेवालाल महाराज चौक' असून थेट स्पर्धा ठिकाणी नोंदणी करण्यात येईल तसेच पूर्वनोंदणी करण्यासाठी परळी तालुका शारीरिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष एस.पी.मुंडे सर ९४२१२७१६०८, राष्ट्रवादी शिक्षक आघाडीचे अध्यक्ष अजय जोशी सर ९८५०४१७८१७ यांना व त्यांच्या सहकारी शिक्षक तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी यांना संपर्क करावा....प्रत्येकाने सहभाग नोंदवावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुलींच्या शिक्षण शुल्कातील फिस माफीचा जीआर जारी

## मुलींनी उच्च शिक्षणासाठी लाभ घ्यावा-आ.सौ. नमिता मुंदडा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्लूएस), सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) तसेच इतर मागासवर्ग (ओबीसी) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काच्या ५० टक्क्यांऐवजी १०० टक्के लाभ मंजूरीचा राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सोमवार ८ जूलै रोजी अध्यादेश काढला आहे.

या योजनेच्या माध्यमातून सामान्य कुटुंबातील मुलींना उच्च शिक्षणासाठी विविध क्षेत्रात संधी उपलब्ध झाली आहे. या संधीचा लाभ मुलींनी घ्यावा. असे आवाहन केज विधानसभा मतदार संघ्याच्या भारतीय जनता पक्षाच्या आमदार सौ. नमिता अक्षय मुंदडा यांनी केले आहे.उच्च




व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व कृषि व पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखालील शैक्षणिक संस्थाद्वारे राबविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या इतर मागास.

# स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात सीटी स्कॅन खरेदीसाठी १५ कोटी मंजूर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागासाठी सीटी स्कॅन मशीन खरेदीसाठी १५ कोटी रुपयांचा प्रस्तावास वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या मंत्रालयाने मान्यता दिली आहे. या विभागाच्या आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी या संदर्भात शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.





या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या मंत्रालयाने ९ जूलै २०२४ रोजी स्वतंत्र शासन निर्णय क्र. यंत्र ख २०२४/प्रक्र. ३६२प्रशा- १ काढले असून या शासन निर्णयात पुढे असे म्हटले आहे की, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेच्या क्ष किरण विभागात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना अत्याधुनिक उपचारांची सोय व्हावी म्हणून सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षात राज्य योजनेअंतर्गत मंजूर अनुदानातुन अक्षरी रुपये पंधरा कोटी फक्त (रु. १५,००,००,०००/-) सर्व करांसहीत इतक्या किंमतीची टर्न की तत्वावरील यंत्रसामग्री व साधनसामग्री खरेदीस सदरील शासन निर्णयानुसार अटी व शर्ती घ्या अधीन राहून झंझावात विकासकामांचा वाढता आलेख केज विधानसभेच्या विकासाचा! मान्यता देत असल्याचे म्हटले आहे. या शासन निर्णयावर वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे अवर सचीव सुधीर जया शेट्टी यांची स्वाक्षरी आहे. अंबाजोगाई येथाल स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागातील यापुर्वीच बसवण्यात आलेली सीटी स्कॅन मशीन मागील काही महिन्यांपासून सातत्याने बंद पडत होती. सदरील मशीन बदलुन नवीन मशीन खरेदीसाठी आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या मंत्रालयात सातत्याने पाठपुरावा केला होता. आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला या मंजूरी मुळे यश आले आहे. स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागात गेली अनेक महिन्यांपासून बंद असलेली सीटी स्कॅन मशिन बदलून नवीन मशीन खरेदी करण्यासाठी राज्य शासनाने १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ साहेब, लोकनेत्या पंकजाताई मुंडे साहेब, माजी खासदार डॉ. प्रितम मुंडे यांचे आभार मानले आहेत.


## आ. नमिता अक्षय मुंदडा यांच्या पाठपुराव्याला आले यश

# 'स्वाराती' मधील बाल अतिदक्षता विभागास २२ कोटींहून अधिक निधी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागाच्या बाल रोग अतिदक्षता विभागासाठी २२ कोटी ८० लाख रुपयांच्या प्रस्तावास वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या मंत्रालयाने मान्यता दिली आहे. या अतिदक्षता विभागाच्या मंजुरी केज विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या मंत्रालयाने २ जुलै २०२४ रोजी आदेश काढले असून या शासन निर्णयात पुढे असे म्हटले आहे की, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या बाल रोग निदान व उपचार विभागात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना अत्याधुनिक उपचारांची सोय व्हावी म्हणून सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षात राज्य



रुग्णांना सुविधा मिळण्याचा मार्ग झाला मोकळा

योजनेअंतर्गत मंजूर अनुदानातुन २२ कोटी ८० लाख रूपये फक्त सर्व करांसहीत यंत्रसामग्री व साधनसामग्री खरेदीस सदरील शासन निर्णयानुसार अटी व शर्ती च्या अधीन राहून मान्यता देत असल्याचे म्हटले आहे. या शासन निर्णयावर आ. नमिता मुंदडा यांनी मानले आभार स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागात बालरोग निदान व उपचार या विभागात स्वतंत्र अतिदक्षता विभाग सुरू करण्यासाठी राज्य शासनाने २२ कोटी ८० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. मुंदडा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, भाजप नेत्या पंकजा मुंडे, माजी खा. डॉ. प्रितम मुंडे यांचे आभार मानले.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे अवर सचिव सुधीर जया शेट्टी यांची स्वाक्षरी आहे. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागातील यापुर्वीच्या बालरोग विभागातील अतिदक्षता विभागात अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध नसल्यामुळे या विभागात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची हेळसांड होवू नये म्हणून नवीन व अत्याधुनिक उपचार सुविधा मिळाव्यात यासाठी स्वतंत्र अतिदक्षता विभाग निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी या विभागाच्या आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या मंत्रालयात सातत्याने पाठपुरावा केला होता. आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला या मंजूरी मुळे यश आले आहे. याचा रुग्णांना फायदा होणार आहे.

# बीड जिल्ह्यातील इनामी जमीनीचा फेर तपास करा

## पो.नि.खाडे यांनी घोटाळेबाजाना लाभ व्हावा या उद्देशातुन केला तपास

बीड / प्रतिनिधी

मल्टिस्टेटच्या प्रकरणात कारवाई न करण्यासाठी १ कोटीची मागणी करणारे पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. मात्र त्यांच पोलीस निरीक्षकाडे बीड जिल्ह्यातील इनाम,देवस्थानच्या जमीन खालसा प्रकरणी तपासाची जबाबदारी असल्याने त्यामध्येही घोटाळेबाज आरोपींशी संगनमत करून कसाबसा तपास केल्याचा आरोप करत इलियास बेग अलताजे बेग यांनी मा.पोलीस अधिक्षक साहेब यांना निवेदन सादर करत फेर तपास करण्याची मागणी केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यात सन २०२२-२०२३ इनाम जमीन घोटाळा प्रकरणी आष्टी, बीड,माजलगाव,धारूर तालुक्यात अनेकांवर गुन्हे दाखल झाले आहे.याबाबत मा.साहेबांनी इनाम जमीनी घोटाळ्यांचा तपास निलंबित पोलीस आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.हरिभाऊ खाडे यांच्याकडेच सोपविण्यात आले होते.त्यांनी आरोपींशी संगनमत करून कसाबसा तपास करत खाडे व इतर अधिकाऱ्यांनी आरोपींशी संगनमत करून आरोपींना मदत व्हावी या प्रमाणे अयोग्य तपास केलेला आहे.श्री.खाडे यांना नुकत्याच एका प्रकरणात १ कोटी रूपयांची लाच मागितल्या प्रकरणी गुन्हा दाखल होऊन अटक करण्यात आली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील इनाम व देवस्थानच्या जमीन घोटाळा प्रकरणी खाडे यांनी केलेला तपास पुन्हा दुसऱ्या सक्षम अधिकाऱ्यांकडून करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

# दीक्षाभूमी येथे झालेल्या आंदोलनातील गुन्हे सरकारने मागे घ्यावेत

## माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई । प्रतिनिधी

पवित्र दीक्षाभूमी येथील भूमिगत पार्किंगच्या मुद्द्याला घेऊन १जुलै ला उसळलेल्या गर्दीनंतर नागपूर पोलिसांनी आंदोलकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. दीक्षाभूमीवर झालेल्या आंदोलनानंतर बांधकाम साहित्याची तोडफोड आणि साहित्य जाळपोळ केल्याप्रकरणी नागपूरच्या बजाज नगर पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हे दाखल केले आहे. आंदोलक गुन्हेगार नाहीत त्यामुळे आंदोलकांवरील गुन्हे सरकारने मागे घ्यावेत, अशी मागणी आज सभागृहात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेना राज्याचे माजी मंत्री आणि नागपूर जिल्ह्याचे



माजी पालकमंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केली.

१जुलै ला दीक्षाभूमी परिसरात झालेल्या घटनेतनंतर बजाजनगर पोलिस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत. यात भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १२५, १३२, १८९(२), १८९(५),१९०, १९१ (२), २९६, ३२६ (एफ), ३२६(जी) अंतर्गत गुन्हा पोलिसांनी दाखल केले आहे. यावेळी विद्यार्थ्यांवर गुन्हा दखल करण्यात आले होते. हे विद्यार्थी शाळा आणि कॉलेज मध्ये शिकणारे विद्यार्थी असल्याने त्यांचा वरील गुन्हे मागे घेण्यात यावे अशी मागणी यावेळी डॉ. राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना केली.

दीक्षाभूमी येथे पार्किंगसाठी खोदलेल्या खड्ड्यामुळे स्तूपाला धोका होईल, बोधिवृक्ष अडचणीत येईल

त्यामुळे दीक्षाभूमी येथे भीमसैनिकांनी स्वयंस्फूर्तीने आंदोलन केले होते. आंदोलन करणाऱ्या शेकडो ज्ञात-अज्ञात आंदोलकांवर पोलिसांनी गंभीर प्रकाराचे गुन्हे दाखल केले आहे. प्रकरणी आम्ही आंदोलन करणारे आहोत गुन्हेगार नाहीत. आंदोलकांवरील गुन्हे सरकारने मागे घ्यावेत, अशी मागणी याअगोदर ही डॉ. राऊत यांनी सभागृहात लावून धरली होती.

आमदार डॉ. नितीन राऊत यांनी आज पुन्हा एकदा भूमिगत पार्किंग विरोधात दीक्षाभूमी येथे घडलेल्या घटनेत दाखल केलेले गुन्हे वापस घेण्याची मागणी केली असता यावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दखल घेत नागपूर पोलीस आयुक्तांना सूचना केले असल्याचे उत्तर दिले. ज्यामुळे आता गुन्हे दखल झालेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.




# निर्मलाताई काकडे आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये विद्यार्थिनीसाठी सबलीकरण कार्यशाळा

गेवराई । प्रतिनिधी

निर्मलाताई काकडे आर्ट्स, कॉमर्स ण्ड सायन्स कॉलेज,शेवगाव यांनी आज ११/०७/२०२४ रोजी प्रा. राजश्री रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली एका प्रभावी महिला सशक्तीकरण कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, नेतृत्व कौशल्ये विकसित करणे आणि समाजात समानता आणि न्याय यासाठी लढण्यास प्रेरित करणे हा होता.कार्यक्रमात प्रा. राजश्री रसाळ यांचा प्रेरणादायी मुख्य वक्तव्य समाविष्ट होते. त्यांनी महिलांनी आयुष्यातील अनेक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी अडथळे पार केले आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी कष्ट करणे आवश्यक आहे यावर भाष्य केले.यानंतर, कार्यशाळेत महिला सबलीकरण या विषयांवर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत महिलांना त्यांच्या अधिकारांबद्दल जागरूक करण्यासाठी, आर्थिक स्वावलंबन कसे मिळवायचे याबद्दल मार्गदर्शन तसेच छळ आणि भेदभावाशी कसे लढायचे याबद्दल त्यांना सक्षम बनवण्यासाठी व आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

निर्मलाताई काकडे आर्ट्स, कॉमर्स ण्ड सायन्स कॉलेज चे प्राचार्या डॉ. पी.ए. दुकळे यांनी अध्यक्षीय भाषणात अशा प्रकारच्या कार्यशाळा विद्यार्थिनींना सशक्त बनवण्यासाठी आणि समाजात समानता आणि न्याय यासाठी लढण्यास सक्षम बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत अशी भूमिका मांडली.विद्यार्थिनींनी कार्यशाळेला उस्पूर्त प्रतिसाद दिला. अनेक विद्यार्थिनींनी कार्यशाळेमुळे त्यांना प्रेरणा मिळाली आहे आणि आता ते आत्मविश्वासाने आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करतील असे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धीवर रीता यांनी केले.प्रास्ताविक प्रा. आसने सोनाली यांनी केले तर आभार प्रा. गरड दिपाली यांनी मानले. कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT